**विभागीय परीक्षांसाठीचे प्रशिक्षण देणाऱ्या व्याख्यात्यांना नियोजित वेळी व्याख्यान घेण्यास परवानगी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक,क्र.परीक्षा-१२०७/प्र.क्र.१२/०७/१७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ४ ऑगस्ट, २००७.

## परिपत्रक

शासनसेवेत प्रत्येक कर्मचाऱ्यांला नियमानुसार विहित केलेल्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते. त्यामुळे मंत्रालयीन सेवेतील लिपिक व लिपिक-टंकलेखक, सहायक व कक्ष अधिकारी या संवर्गामधील उमेदवारांना संबंधित विषयाची यथोचित माहिती करुन देण्याच्या दृष्टीने अशा परीक्षांच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्याकरीता प्रत्येक वर्षी प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखण्यात येतो व त्यानुसार प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते.

मंत्रालयीन विभागांमधील संबंधित उमेदवारांना परिक्षार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरता, प्रशासकीय विभागांमधील अधिकाऱ्यांची, संबंधित विषयातील सखोल ज्ञान / पारंगतता, प्रशिक्षण देण्याबाबतची हातोटी आणि गोपनीय स्वरुपाचे कामकाज पार पाडण्याविषयीची सचोटी या सारख्या बाबी विचारात घेवून, सर्वसाधारणत: नियुक्ती केली जाते. परंतु कार्यबाहुल्यामुळे व्याख्याते ज्या विभागात काम करतात त्या विभागाने त्यांच्या विभागांमधील व्याख्यात्यांना प्रशिक्षण देण्यास परवानगी नाकारली किंवा मान्यता नसल्याचे या विभागास आयत्यावेळी कळविले तर अन्य इच्छुक व्याख्यात्यांची इतर विभागांकडून शिफारस मिळविण्याकरीता, त्याची इत्यंभूत माहिती, संबंधीत विभागांकडून प्राप्त करुन घेवून, नियुक्ती करणे फारच अडचणीचे होते. प्रशिक्षणाच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार, सध्या निरनिराळया संवर्गासाठी असलेल्या परीक्षांच्या विषयांनुसार व्याख्याने देण्याकरीता, प्रतिवर्षी, अगोदरच नियुक्त असलेल्या व्याख्यात्यांमार्फतच प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली जाते.

सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण देण्याकरीता नव्याने नियुक्त केल्या जाणाऱ्या व्याख्यात्यांकडून आवश्यक त्या सेवा समाधानकारकरित्या दिल्या जातील याची सुरवातीला तितकीशी खात्री नसते. त्यामुळे प्रशिक्षणापासून निकाल लागेपर्यतची सर्व टप्प्यावरील कार्यवाही सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने, **व्याख्यात्यांच्या नियुक्त्यांमध्ये वेळोवेळी बदल करणे योग्य ठरत नाही.**

३५ ३२

त्यामुळे कार्यरत असलेल्या व्याख्यात्यांनीच या परीक्षेसंदर्भातील प्रशिक्षणाची जबाबदारी पार पाडणे आवश्यक ठरते. अशा परिस्थितीत विभागीय परीक्षांबाबत संबंधीत व्याख्यात्यांकडे सुपूर्त केलेले कामकाज करण्यास संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांना परवानगी नाकारणे योग्य होणार नाही. कारण त्यामुळे परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेवर त्याचा विपरीत परिणाम होतो. यास्तव विभागीय परीक्षा विषयक नियमानुसार परीक्षा घेणे आणि तद्नुषंगिक सर्व बाबी संबंधितांकडून पार पाडल्या जाणे ही शासकीय कर्मचाऱ्याच्या कर्तव्यामधील अनिवार्य अशी बाब असल्याने, कार्यरत असलेल्या / होणाऱ्या सर्व व्याख्यात्यांना, विभागीय परीक्षेसंदर्भातील आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याबाबत परवानगी देणे संबंधीत प्रशासकीय विभागांना बंधनकारक राहील.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००७०८०२१७१००२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ISSUED
On 6/8/07
By Mohite

(वि.द.आठवले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
निवड नस्ती.